# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
वणी-दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४,
Vani-Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
**EPABX:** 0253-2539100-300, **Phone:** 0253-2539170, 173
**Website :** www.muhs.ac.in, **E-mail :** sw@muhs.ac.in

MUHS

**संदिप श्रीराम कुलकर्णी**
(बी.एस.एल.,एलएल.बी.,एम.पी.ए.,पी.जी.एच.डी.आर.)
**प्र.संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Sandip Sriram kulkarni**
(B.S.L, LL,B., M.P.A.,P.G.D.H.R)
**offg.Director, Student Welfare**


मआविवि/एसडब्ल्यू/स्कीम/ २८८ /२०२१ दिनांक : १०/०३/२०२१

**"परिपत्रक क्र.०३/२०२१"**

आवक नं. 8/581/2020-21
दिनांक 31/03/2021

**प्रति,**

मा. अधिष्ठाता/प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये,
म.आ.वि.वि. नाशिक.

**विषय :** धन्वंतरी विद्याधन योजना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ बाबत...

**मा.महोदय / महोदया,**

(१) प्रस्तावना :

धन्वंतरी विद्याधन योजनेत विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील आरोग्य विज्ञानाच्या अभ्यासक्रमाच्या नियमित ज्या विद्यार्थ्यांनी शिक्षणाकरीता बँकेकडून महाविद्यालयाचे शिक्षण शुल्क भरण्याकरीता कर्ज घेतले असेल अशा कर्जावरील व्याजाच्या रक्कमेच्या परताव्याकरीता ठराविक मर्यादेपर्यंत अनुदान विद्यापीठातर्फे देण्यात यावे या उद्देशाने सदर योजना सुरु करण्यात आली आहे. विद्यार्थ्याने कर्जाची रक्कम एकरक्कमी घेतलेली असेल किंवा मंजूर झालेल्या शैक्षणिक कर्जापैकी दरवर्षी कर्ज हप्त्याची रक्कम घेतलेली असेल, अशा संबंधीत संलग्नित महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त पदव्युत्तर पदवीच्या संस्थेतील विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या नियमित १५% पदवी शिक्षण घेणाऱ्या व १०% पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सदर योजना लागू असेल.

(२) सदर योजनेचा लाभ पदवी व पदव्युत्तर नियमित, मागील वर्षात उत्तीर्ण झालेल्या, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना देण्यात यावा.

(३) खालील विद्यार्थी या योजनेचा लाभ घेण्यास अपात्र असतील;

अ) आंतरवासियता (Internship) प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी.

ब) अनिवासी भारतीय (Non Resident Indian - NRI) विद्यार्थी.

क) परराज्यातून आलेले (Other than Maharashtra State - OMS) विद्यार्थी.

ड) व्यवस्थापन कोटयातून (Management Quota) प्रवेश घेतलेले विद्यार्थी.

31.3.21

To Dr. Bagewadi, inform about the scholarship to all eligible students & compile within given time.

(४) विद्यार्थ्यास केंद्र किंवा राज्य शासनाच्या किंवा अन्य संस्थांकडून शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, फेलोशिप शुल्क परतावा, शुल्क सवलत मिळत असले तरी देखील असे विद्यार्थी सदर योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतील. तथापि, महाराष्ट्र शासनातर्फे राबविली जात असलेली (Education Loan Subsidy Scheme) शैक्षणिक कर्ज व्याज अनुदान सवलत घेणा-या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या सदर योजनेचा लाभ घेता येणार नाही.

(५) विद्यार्थ्यांनी शिक्षणाकरीता (शैक्षणिक शुल्क भरण्याकरीता) बॅकेकडून संपुर्ण कर्ज एकरक्कमी घेतलेली असेल किंवा मंजूर झालेल्या कर्जापैकी दरवर्षी कर्ज हप्त्याची रक्कम घेत/घेणार असेल, अशा सर्व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना त्या महाविद्यालयाच्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या १५% पदवी व १०% पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या नियमित व पात्र विद्यार्थ्यासाठी सदर योजना लागू असेल.

(६) ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे/कुटुंबाचे सर्व स्त्रोतांतून प्राप्त उत्पन्न रुपये **०८ (आठ)** लक्षा पेक्षा कमी असेल असे विद्यार्थी सदर योजनेचा लाभ घेऊ शकतील. महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांची व प्रस्ताव यादी तयार करतांना सदर योजनेचा लाभ घेऊन ईच्छिणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न सर्वात कमी असेल अशा विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. विद्यापीठाच्या दरवर्षीच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात केलेल्या तरतूदीचे मर्यादेत अनुदान वाटपाची कमाल मर्यादा प्रति पात्र विद्यार्थी रु. ३०,०००/- (तीस हजार मात्र) असेल. सदर रक्कमेत वेळोवेळी वाढ करण्याचा अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत असतील.

(७) विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयाकडुन प्राप्त होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रस्तावानुसार व्याजाच्या रक्कमेची / अनुदानाची परीगणना करण्यासाठी विद्यार्थ्याने त्या लगतच्या मागील वित्तीय वर्षाचे कालावधीत शैक्षणिक कर्जावर बॅकेने आकारलेले व्याज व विद्यार्थ्यांच्या पालकाच्या कुटुंबाचे एकत्रित उत्पनाचा दाखला ग्राहय धरण्यात यावा.

(८) शिक्षणशुल्क समितीने संलग्नित महाविद्यालयासाठी निर्धारीत केलेले शुल्क विचारात घेऊन विद्यार्थ्याने १२ महिन्यांच्या कालावधीमध्ये ज्या महिन्यात शैक्षणिक कर्ज घेतले असेल, तो महिना सोडून त्याच्या पुढील महिन्यापासुन कर्ज रक्कमेवरील व्याज रकमेची परिगणना करण्यात यावी.

(९) शैक्षणिक कर्जाच्या व्याजाचे अनुदान देतांना शिक्षण शुल्क समितीचे चालु वर्षाचे शिक्षण शुल्क ग्राहय धरले जाईल. शिक्षण शुल्क समितीने संबंधीत महाविद्यालयाचे चालु वर्षाचे शिक्षण शुल्क निर्धारीत केलेले नसल्यास लगतच्या मागील वर्षाचे शिक्षण शुल्क समितीने निर्धारीत केलेले शिक्षण शुल्क ग्राहय धरण्यात यावे. तसेच, ज्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या शैक्षणिक प्रवेशानंतर

एकरक्कमी कर्ज घेतलेले असेल अशा विद्यार्थ्यांना त्या आर्थिक वर्षात व्याजाच्या रकमेची परीगणना करुन एकदाच व्याज रक्कम अनुदान अनुज्ञेय असेल.

(१०) सदर योजनेचा लाभ घेवू ईच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी परिपुर्ण प्रस्ताव महाविद्यालयामार्फत विद्यापीठास विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक असेल. सदर योजनेची माहिती त्याबाबतचे भित्तीपत्र व मुदतीबाबतचे परिपत्रक विद्यापीठ सर्व संलग्नित महाविद्यालयांना टपालाद्वारे पाठवेल. सदर माहिती भित्तीपत्र व परिपत्रक महाविद्यालयाने नोटीस बोर्डावर लावणे व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुण देणे बंधनकारक असेल. प्रस्तावासोबत खालील दस्ताऐवज जोडणे बंधनकारक असेल.

अ) विद्यार्थ्यांचा प्राचार्यांनी साक्षांकीत केलेला संपुर्ण माहिती भरलेला नमुना आवेदन अर्ज.

ब) विद्यार्थ्यांचे स्वयंघोषणापत्र.

क) बॅंक व्यवस्थापकांच्या सही शिक्क्यासह विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेल्या नमुन्यातील बॅंकेचे पत्र

(मंजूर झालेल्या कर्जापैकी प्रत्यक्ष वाटप करण्यात आलेल्या कर्जाचा व कर्जावरील व्याजदरासह होणाऱ्या व्याज रक्कमेचा त्यामध्ये उल्लेख असावा).

ड) लगतच्या गतवर्षी उत्तीर्ण झालेल्या विद्यापीठाच्या परिक्षेच्या गुणपत्रकाची विद्यार्थ्यांनी स्वयंसाक्षांकित केलेली छाया प्रत.

इ) आवेदक विद्यार्थ्यांच्या पालकांच्या एकत्रित उत्पन्नाचा लगतच्या गतवर्षाच्या दाखल्याची (आर्थिक वर्ष २०१९-२०) मुळ प्रत किंवा स्वयंसाक्षांकीत केलेली छाया प्रत. तहसीलदारांचा/समक्ष प्राधिकाऱ्याने निर्गमीत केलेल्या उत्पनाच्या दाखल्या व्यतिरीक्त इतर कोणत्याही प्रकारचा दाखला ग्राहय धरण्यात येणार नाही.

फ) व्याजाच्या रक्कमेची मागणी केलेल्या आर्थिक वर्षातील (१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१) या कालावधीचे बॅंकेने दिलेली कर्जउताऱ्याची (Loan Statement) मुळ प्रत.

ग) आवेदक विद्यार्थ्यांच्या आधारकार्डची विद्यार्थ्यांनी स्वयंसाक्षांकीत केलेली प्रत.

(११) प्रस्तावासोबत सादर केलेल्या बॅंकेने दिलेल्या कर्जखात्याच्या उताऱ्यामध्ये (स्टेटमेंटमध्ये) किंवा बॅंक व्यवस्थापकांच्या पत्रामध्ये प्रमाणित केल्याप्रमाणे प्रत्यक्ष आकारण्यात आलेला व्याज दर किंवा जास्तीत जास्त १५% व्याजदर या पैकी जो कमी असेल त्या दराने कर्ज रक्कमेवरील व्याजाची परिगणना करण्यात येईल.

(१२) विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रस्तावाची प्रशासकीय स्तरावर छाननी करण्यात यावी. प्रस्ताव अपुर्ण असेल किंवा निर्धारीत मुदतीनंतर विद्यापीठास प्राप्त झालेला असेल तर असा प्रस्ताव नाकारण्याचे विद्यापीठास अधिकार असतील. तसेच फॅक्स व ई-मेलव्दारे प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाही. उशिरा किंवा अपुर्ण प्रस्तावासंबंधी विद्यार्थ्यांकडुन किंवा त्यांच्या पालकांकडुन विद्यापीठास प्राप्त तक्रारीची संपुर्ण जबाबदारी महाविद्यालयांवर असेल.

(१३) विद्यार्थ्यांनी ज्या बॅकेकडून शैक्षणिक कर्ज घेतले आहे अशा संबंधीत बॅकेच्या नावे व्याज अनुदानाची रक्कम धनाकर्षाव्दारे संबंधीत विद्यार्थ्यांना प्राचार्यामार्फत वाटप करण्यात येईल. अनुदानाच्या रक्कमेचा धनादेश कुठल्याही परिस्थितीत कर्ज ज्या बॅककडुन घेतलेले असेल त्या बॅकेच्या नावाव्यतिरीक्त इतराचे नावे मिळणार नाही.

(१४) महाविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त नियमावली अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव महाविद्यालयांच्या कव्हरींग लेटरसह **दि. ३१/०५/२०२१** पर्यत विद्यापीठात स्विकारण्यात येतील. उशिरा तथा विलंबाने प्राप्त झालेल्या कोणत्याही प्रस्तावावर विद्यापीठ कार्यवाही करणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

वर नमूद केलेल्या योजनेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे सर्व हक्क विद्यापीठाकडे राखून ठेवण्यात आले आहेत. योजनाबाबतचा तपशील विद्यापीठाच्या www.muhs.ac.in (Departments → Students' Welfare Dept. → Circular) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**प्र.संचालक**
**विद्यार्थी कल्याण**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (सहपत्र "अ")

नमुना अर्ज

धन्वंतरी विद्याधन योजना

पासपोर्ट आकाराचा फोटो

प्रति,

मा. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग,

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,

नाशिक.

| अ.क्र. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| १ | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | |
| २ | विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव व पत्ता | |
| ३ | मोबाईल नंबर / दुरध्वनी क्र. (STD) कोडसह | |
| ४ | इमेल आयडी (email) | |
| ५ | विद्यार्थ्याचा कायम निवासी पत्ता | |
| ६ | जन्म तारीख व वय | |
| ७ | सध्या शिकत असलेला वर्ग आणि कोर्स | |
| ८ | महाविद्यालयात शिकत असलेल्या वर्गाचे आकारण्यात आलेले शैक्षणिक शुल्क | |
| ९ | गतवर्षी उत्तीर्ण वर्ग व गुण (गुणपत्राची प्रत जोडावी) | |
| १० | मागासवर्गीय असल्यास प्रकार (होय असल्यास जातीच्या दाखल्याची प्रत जोडावी) | होय / नाही वर्गवारी : |
| ११ | शारिरीक अपंगत्व असल्यास (होय असल्यास अंपगत्वाच्या प्रमाणपत्राची प्रत जोडावी) | होय / नाही |
| १२ | विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय ? | होय / नाही |
| १३ | पालकांचे संपूर्ण नाव | |
| १४ | पालकांशी विद्यार्थ्याचे नाते | |
| १५ | पालकांचा संपूर्ण पत्ता व दुरध्वनी क्र. (STD) कोडसह/ मोबाईल क्रमांक : | |
| १६ | पालकांचा व्यवसाय / नोकरी | |
| १७ | पालकांचे वार्षिक उत्पन्न (तहसीलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा स्वसाक्षांकीत दाखला सोबत जोडावा.) | |
| १८ | पालकांची नोकरी / व्यवसायाचा पत्ता | |
| १९ | विद्यार्थ्याच्या आधारकार्डचा नंबर नमूद करावा (आधारकार्डची स्वसाक्षांकीत प्रत जोडणे अनिवार्य) | |
| २० | महाराष्ट्र शासनातर्फे राबविलेली जात असलेली (Education Loan Subsidy Scheme) शैक्षणिक कर्ज व्याज अनुदान सवलत घेणा-या विद्यार्थ्यांना मिळणा-या सवलतीचा तपशिल नमुद करण्यात यावा. | व्याज अनुदान सवलत मिळते ...... **अथवा** नाही ...... |

विद्यापीठाच्या धन्वंतरी विद्याधन योजनेनुसार उपलब्ध असलेल्या शैक्षणिक कर्जावरील व्याज रकमेचे अनुदान मिळावे म्हणून मी इच्छुक असून कृपया सदर योजनेचा लाभ मला मिळावा. तथापि मला सन.................. (वर्ष नमुद करावे) या शैक्षणिक वर्षामध्ये या योजनेचा लाभ मिळालेला आहे / नाही.

धन्वंतरी विद्याधन योजनेच्या सर्व अटी व शर्ती जाणून घेतल्या आहेत व त्यांचे पालन करणे माझेवर बंधनकारक राहील हे मी मान्य करतो / करते.

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी, योजनेबाबत असलेल्या सर्व नियमांचे मी पालन करीन. या संदर्भात नियमात बदल करण्याचे सर्व हक्क विद्यापीठाकडे असतील तसेच सदर अनुदान हे विद्यापीठ निधीतून मिळत असून तो माझा हक्क नाही याची मला जाणीव आहे. मी असे जाहीर करतो / करते की, सदर अर्जात नमुद केलेली माहीती खरी आहे. नमुद केलेली माहिती खोटी असल्यास / तफावत आढळल्यास मी योग्य त्या शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र असेन.

मी असे प्रमाणित करतो / करते की, सदर विद्यार्थ्यास महाराष्ट्र शासनाकडून व्याज अनुदान सवलत मिळत नाही/मिळणार नाही.

**विद्यार्थ्यांचे नाव व सही :** **पालकांचे नाव व सही:**

**दिनांक :** **दिनांक :**

**महाविद्यालयाचे हमीपत्र (Undertaking)**

माझ्या माहितीप्रमाणे वरील सर्व माहिती खरी असून मी असे प्रमाणित करतो / करते की, सदर विद्यार्थ्यास महाराष्ट्र शासनाकडून तिच्या / त्याच्या शैक्षणिक कर्जावर व्याज अनुदान सवलत मिळत नाही / मिळणार नाही.

**महाविद्यालयाचा शिक्का** **अधिष्ठाता/प्राचार्याची सही**

---

## तपासणी सुची (Check List)

| अ.क्र. | सादर करावयाची कागदपत्रे | होय/नाही | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेला सहपत्र "अ"(नमुना अर्ज ) परिपुर्ण भरला आहे काय ? | | |
| २ | बॅक स्टेटमेंट सहपत्र "ब"(नमुना अर्ज ) (१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१) जोडले आहे काय ? | | |
| ३ | गतवर्षात उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रकाची (विद्यार्थ्याची स्वसाक्षांकीत प्रत) प्रत जोडली आहे काय ? | | |
| ४ | गतवर्षाचा उत्पन्नाच्या दाखल्याची स्वसाक्षांकीत प्रत (आर्थिक वर्ष - २०१९-२०) जोडली आहे काय ? (फक्त तहसिलदारांचा दाखला) | | |
| ५ | आधारकार्ड ची स्वसाक्षांकीत प्रत | | |

**टिप :- महाविद्यालयाने प्रस्तावांची पुर्तता करतांना तपासणी सूची प्रमाणे दस्तावेज तपासून अनुक्रमांकाप्रमाणे पृष्ठांकीत करुन सादर करावेत.**

**महाविद्यालय लिपीक :-** **अधिष्ठाता/प्राचार्य**

**भ्रमणध्वनी क्र:-** **(सही व शिक्का)**

(सहपत्र - "ब")

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

- विद्यार्थी कल्याण विभाग -

## स्वयंघोषणापत्र

अर्जदाराचा फोटो

मी ______________________________ श्री. ______________________________

यांचा मुलगा/मुलगी वय ______ वर्ष, आधार क्रमांक ____________________ व्यवसाय ____________________

राहणार ______________________________________________ यान्वारे घोषित करतो/करते

की, योजनेचा अर्ज व त्यासोबत जोडलेली कागदपत्रे याबाबतची माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजूतीनूसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/किंवा संबंधित कायदयानूसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानूसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण : ____________________ अर्जदाराची सही : ____________________

दिनांकः ____________________ अर्जदाराचे नाव : ____________________

# नमुना अर्ज

(सहपत्र "क")

## बॅंकेच्या मुखपृष्ठावर (ON BANK LETTER HEAD)

प्रति,
मा. संचालक,
विद्यार्थी कल्याण विभाग,
मआविवि, नाशिक.

**विषय :** शैक्षणिक कर्जावरील व्याजाच्या परताव्याबाबत...

**संदर्भ :** विद्यापीठाची धन्वंतरी विद्याधन योजना.

| क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १. | बॅंकेचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्र. | |
| २. | कर्ज घेतलेल्या विद्यार्थ्याचे नाव | |
| ३. | महाविद्यालयाचे नाव | |
| ४. | शिकत असलेला वर्ग व अभ्यासक्रम | |
| ५. | बॅंकेने वितरीत केलेले कर्ज व दिनांक | अक्षरी रु.<br>अंकी रु. दि. |
| ६. | ०१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ पर्यत बॅंकेने मंजूर केलेल्या कर्जापैकी वाटप केलेली रक्कम | अक्षरी रु.<br>अंकी रु. |
| ७. | ०१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ दरम्यान भरलेल्या व्याजाची रक्कम व व्याजाचा दर | व्याज दर : %<br>व्याजाची होणारी रक्कम<br>अक्षरी रु. :<br>अंकी रु. : |

**बॅंकेचा शिक्का**

**बॅंक मॅनेजरची स्वाक्षरी**

(सहपत्र "ड")

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
# Maharashtra University of Health Sciences, Nashik

MUHS

## विद्यार्थी कल्याण विभाग
### अभिप्राय/सूचना नमुना
(महाविद्यालयासाठी)

१) महाविद्यालयाचे नाव :- ______________________________

२) महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्याचे नाव व पद :-__________________

३) भ्रमणध्वनी क्र.:-________________________________

४) ई-मेल :-__________________________________________

५) परिपत्रकातील योजनेसंबंधीची माहिती :- ☐ सर्वोत्तम ☐ उत्तम ☐ पुरेशी ☐ साधारण

६) महाविद्यालयाला या योजनेची माहिती होती का? होय/नाही

७) विद्यार्थ्यांकडून सदर योजनेस कसा प्रतिसाद मिळाला?

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

८) योजना अधिक प्रभावीपणे राबविणेकरीताच्या सूचना-

टिप: - कृपया आपले म्हणणे थोडक्यात लिहा.

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

नाव व स्वाक्षरी

(सहपत्र "इ")

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
# Maharashtra University of Health Sciences, Nashik

MUHS

## विद्यार्थी कल्याण विभाग
### अभिप्राय/सूचना नमुना
(विद्यार्थ्यांसाठी)

१) महाविद्यालयाचे नाव :- ____________________

२) विद्यार्थ्याचे नाव :- ____________________

३) भ्रमणध्वनी क्र.:- ____________________

४) ई-मेल :- ____________________

५) परिपत्रकातील योजनेसंबंधीची माहिती :- ☐ सर्वोत्तम ☐ उत्तम ☐ पुरेशी ☐ साधारण

६) आपणास सदर योजनेची माहिती कशी मिळाली :- ____________________

____________________

७) तुमच्यासाठी हि योजना महत्वाची आहे का व कशी ?

____________________

____________________

____________________

८) तुमच्यासाठी ही योजना मदत करणारी आहे का ? असल्यास तसे नमूद करा.

____________________

____________________

____________________

९) योजना अधिक प्रभावीपणे राबविणेकरीताच्या सूचना-

टिप: - कृपया आपले म्हणणे थोडक्यात लिहा.

____________________

____________________

____________________

नाव व स्वाक्षरी